# ॥ अध्याय दहावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ ॥ श्रीक्षेत्र द्वारकापुरी प्रसिद्ध । जेथें नांदतसे परमात्मा शुद्ध । श्रीकृष्ण भगवान् प्रबुद्ध । पूर्णावतार तारक जो ॥ १ ॥ द्वारका 'पश्चिमधाम' विख्यात । गोमतीतीर्थ वाहे अखंडित । अनादिस्थान देवतांसहित । शोभिवंत दिसतसे ॥ २ ॥ साधु संत सज्जन विरागी । भक्त दास हठयोगी राजयोगी । आपापल्या कार्यांलागी । भजती द्वारकाधीशा ॥ ३ ॥ त्या सुक्षेत्र द्वारकावतींत । एक योगीपुरुष वसत । भुन्याबुवा नामें संत । वृद्ध पुरुष असा जो ॥ ४ ॥ ज्याचे अंगावरी शुभ्ररोम । बहुत दीर्घ म्हणूनि नाम । भुन्याबुवा योगी उत्तम । अधिकारी मोक्षमार्गींचा ॥ ५ ॥ त्रिकाल गोमतीतीर्थ-तीरीं । योगी वसे सदाचारी । भुन्याबुवा ब्रह्मात्मविचारी । भगवद्भक्त निष्काम ॥ ६ ॥ द्वारका यात्रेसी जे जे येती । ते संपूर्ण यात्रा करिती । आणि भुन्याबुवाचें दर्शन घेती । प्रेमभावेंकरूनि ॥ ७ ॥ ते भुन्याबुवा हठयोगक्रिया । करीत होते परमार्थ साधावया । दुस्तर भवसागर तरावया । मनोनिग्रहेंकरूनि ॥ ८ ॥ जिंकूनियां इंद्रियग्राम । हृदयस्थ ओळखावा आत्माराम । म्हणूनिया साधुसमागम । निष्काम सेविला जयांनीं ॥ ९ ॥ भजन पूजन आरती उत्साह । समारंभ साधुजनांसह । करित होते अपरिग्रह । भुन्याबुवा सत्पुरुष ॥ १० ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह दंभादि विकार । परित्यागुनी निरंतर । भगवद्भजनीं निर्मल ॥ ११ ॥ पुराण ग्रंथ वेदांतश्रवण । नित्य चर्चा कार्यकारण । ऊहापोह विचक्षण । भुन्याबुवास्थानीं होतसे ॥ १२ ॥ सदा भेटती महात्माजन । परमेश्वरस्वरूप-चर्चा निशिदिन । उत्तमप्रकारें परोक्षज्ञान- । युक्त होते भुन्याबुवा ॥ १३ ॥ आल्या गेलियाचा सत्कार । मधुर



भाषणें गंभीर । भुन्याबुवा करिती साचार । उल्हासयुक्त मानसें ॥ १४ ॥ उपमर्द कठोरभाषण । दुसऱ्यासी विनाकारण । दुखविणें पराचें अंतःकरण । साधुलक्षणें नव्हेत हीं ॥ १५ ॥ सत्यप्रियवाक्येंकरून । संतुष्ट होती सर्वजन । तस्मात् तेंचि बोलावें वचन । 'वचनीं किमर्थ दरिद्रता' ॥ १६ ॥ सत्यवचन मधुर प्रिय । बोलतां सर्वभूतीं निरामय । धनादिक खर्च न होतां अक्षय । सर्वोपयोगीं येतसे ॥ १७ ॥ मधुर भाषण ही औषधी एक । प्रदानें सर्वत्र संतोषकारक । कटु वचन वज्रकंटक । दुःखदायक सदा असे ॥ १८ ॥ कटुशब्दबाण श्रवणद्वारें । ज्या समयीं अंतरीं संचरे । तेव्हां देह इंद्रियांसी बहुप्रकारें । दुःसह दुःख होतसे ॥ १९ ॥ कटुशब्द अंतरीं सहन । कोणासीही न होय म्हणून । दुःखें तळमळितसे मन । चिंतानिमग्न असत तें ॥ २० ॥ प्राणीमात्रासी कटु अप्रिय । वचन लागून राहतें रोगमय । कांहीं न सुचे न वाटे प्रिय । दुःखशोकप्रद होय जें ॥ २१ ॥ लोकांमाजीं बोलती म्हण । कटुशब्द खोंचे जसा प्रखरबाण । कटु मर्म वाक्याचें उच्चारण । सर्वस्वीं नाशकारक असे ॥ २२ ॥ म्हणून शहाण्या सुशिक्षितांनीं । कटु अप्रिय अनृत मर्मवचनीं । दुखवूं नये प्राण्यालागुनी । कोणासीही कदापि ॥ २३ ॥ सत्य प्रिय मधुर रसाळ । अवश्यमेव वचन चिरकाळ । सर्वत्रांसंगें बोलावें निर्मळ । उत्तम फलदायक जें ॥ २४ ॥ सत्य प्रिय भाषण अमृततुल्य । विरहित समूलकौटिल्य । नेमें बोलतां ब्रह्मकैवल्य । सर्वसौख्य उपलब्धे ॥ २५ ॥ हाचि वेदशास्त्रांचा नियम । आज्ञा प्रमाणरूप उत्तम । अखिलसौख्यार्थी सुगम । विनिर्णित मुख्यत्वें हो ॥ २६ ॥ हा नियम सर्वत्रांसी पाहिजे । परंतु पूर्वसुकृतें लाहिजे । धर्म अर्थ काम मोक्ष पाविजे । चतुर्विध पुरुषार्थ यायोगें ॥ २७ ॥ हें सत्य-प्रिय-भाषणव्रत । पाळितां देव होती प्रसन्न त्वरित । मैत्री सर्वत्र सख्य जोडत । ऐसें सुलभ साहजिक हें ॥ २८ ॥ कटु अप्रिय अनृत । भाषणें कलिरायाच्या युगांत । संतति संपत्ति अपरिमित । प्राप्त होती निश्चयें ॥ २९ ॥ याप्रकारें कोणी बोलती । कोणी उदाहरणें दाविती । खोट्या कर्में सुखी झालों म्हणती । कोणी

सांगती अनुभव ॥ ३० ॥ परंतु हें निर्मूल अप्रमाणिक । सर्वपरी अनर्थकारक । असत्य दुराग्रह घातक । इहपरलोकीं निश्चयें ॥ ३१ ॥ पूर्वपुण्योदयसंस्कारें । धनादिक प्राप्त होत सारें । कधींही अनृत दुष्कर्माचारें । न होय प्राप्त सहसाही ॥ ३२ ॥ भ्रांतिष्ट ते अहंकारमदें । वाग्जल्पना करिती विषादें । जैसें मद्यपी बडबडे प्रमादें ।.विचारशून्य होऊनि ॥ ३३ ॥ जेवीं भूतें अंगीं संचरतीं । अभद्र निंद्यवचनें बोलतीं । स्वदेहाची नसे स्मृति । तें बडबडणें वृथैव ॥ ३४ ॥ अथवा होतां वायुप्रकोप । भलभलते चाळे करी अनेक । ते खरें ऐसे न मानिती लोक । जो वायु मात्रापानें उतरतो ॥ ३५ ॥ असत् श्रीमदांधालागून । दारिद्र्य हेंचि परमांजन । स्पर्शतां देखती डोळे उघडून । मग अश्रुपात गाळिती ॥ ३६ ॥ दारिद्र्यांजन चटके लागतां । शुद्धीवर येती तत्त्वतां । आपल्यासारखें सर्वभूतां । दारिद्र्यानुभवें पाहती ॥ ३७ ॥ तात्पर्य सत्य प्रिय मंजुल । मर्मभेदरहित प्रांजल । वचन बोलावें सर्वकाल । तेणें सर्वार्थ प्राप्त होतसे ॥ ३८ ॥ श्रीसद्गुरु श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ । केव्हां भेटेल महात्मा श्रेष्ठ । परब्रह्मात्मस्वरूप इष्ट । दाविल हृदयस्थ निजगुह्य ॥ ३९ ॥ कधीं होईल प्रारब्धोदय । अपरोक्षज्ञानी श्रीगुरुराय । पूर्णब्रह्म परमेश्वर दत्तात्रेय । योगींद्र केव्हां भेटतील ॥ ४० ॥ नानावेषें श्रीदत्तावधूत । जगत्कल्याणार्थ संचरत । जयाच्या दर्शनार्थ योगी संत । अनुष्ठान व्रतें आचरती ॥ ४१ ॥ पूर्ण ब्रह्म सर्वाधिष्ठान । स्वरूप सच्चिदानंदघन । देशकालवस्तुपरिछिन्न-विहीन । अव्यय सनातन जगदात्मा ॥ ४२ ॥ त्या अलखनिरंजनाची फेरी । लोकानुग्रहास्तव महीवरी । येतसे देवस्थानीं तीर्थक्षेत्रीं । धरित्री पावन करावया ॥ ४३ ॥ जो जगत्कारणविवर्तोपादान । हठयोगराजयोगादि करून । दाता वेदप्रतिपाद्य सनातन । योगाधीश्वर फिरतसे ॥ ४४ ॥ ऋषि योगी साधु भक्तजन । श्रीगुरुदत्तात्रेयोपासन । प्राप्त व्हावया ज्ञानविज्ञान । करिती अनुदिन अनन्यें ॥ ४५ ॥ तो दीनानाथ योगीराज । श्रीस्वामीसमर्थमहाराज । स्मरणगामी अधोक्षज । देईल मज दर्शन



जरी ॥ ४६ ॥ दर्शन देऊनि कृपा करील । दयासागर दीनवत्सल । तरी एकही न लागतां पल । होईल सिद्ध अभीष्ट ॥ ४७ ॥ जो सद्गुरु कालाचाही काल । परमात्मस्वरूप पूर्ण विशाल । भक्ताभीष्टप्रद महत्कृपाल । अत्रिबाल जगद्गुरु ॥ ४८ ॥ तो स्मरणगामी यदा धांवे । अपारसौख्य काय पुसावें । शीघ्र सत्यपारमार्थिक व्हावें । यांत आश्चर्य कोणतें ॥ ४९ ॥ त्या परमपुरुषाचें दर्शन । केव्हां होईल मजलागून । कृतकृत्यता त्यावांचून । होणार नाहीं सर्वथा ॥ ५० ॥ ऐशा विचारसागरांत । भुन्याबुवाचें निमग्न चित्त । असतां घडलें अकस्मात् । श्रोतीं सावध परिसावें ॥ ५१ ॥ श्रीकृष्णदत्तात्रेय योगीश्वर । श्रीमत्परमहंसयतिवर- । रूपें प्रकटले भक्तासमोर । भुन्याबुवाच्या स्थानांत ॥ ५२ ॥ जैसे निजभक्त प्रल्हादास्तव । स्तंभीं प्रकटले रमाधव । नृसिंहावतार ईश्वर वास्तव । भक्तसंरक्षक उद्भवले ॥ ५३ ॥ हिरण्यकश्यपूचा विध्वंस । करूनि रक्षिलें प्रल्हादास । तेचि नृसिंहरूप परमहंस । जगन्निवास उभे ठेले ॥ ५४ ॥ त्या कालीं भुन्याबुवाच्या ध्यानांत । श्रीनृसिंह-दत्तावधूत । परमहंसरूपें मूर्तिमंत । आत्मस्वरूप दाविती ॥ ५५ ॥ परमहंस गुरुमूर्तीला । मानसीं देखूनि बुवाला । अंतर्बाह्य आनंद जाहला । तो वर्णिला नव जाय ॥ ५६ ॥ स्तंभ स्वेद आणि तिसरा रोमांच । स्वरभंग कंप तो पांचवा साच । वैवर्ण्य अश्रुपात प्रलय हेच । अष्टभाव उदेले ॥ ५७ ॥ आनंदाश्रु प्रेमें वाहती । अवधूतमूर्ति दिसे चित्तीं । नेत्र उघडून जंव पहाती । तंव ती मूर्ति समोर ॥ ५८ ॥ अंतरीं देखिलें तेंचि बाह्य । अविनाशी सर्वत्र ग्राह्य । दीनप्रणतजनांसी साह्य । तें भगवत्स्वरूप विलोकिलें ॥ ५९ ॥ पाहों जैसें भूषण सुवर्ण । अंतर्बाह्य एकचि दिसे वर्ण । नाम मात्र सगुण निर्गुण । एकचि पूर्णब्रह्म तें ॥ ६० ॥ घटादि नामधेय वाचारंभण । विकारहीन मृत्तिका कारण । तैसें बहिरंतरीं अद्वितीय पूर्ण । परमेश्वरस्वरूप असे ॥ ६१ ॥ भुन्याबुवासी पटला प्रत्यय । अंतर्बाह्य एक निरामय । परमहंसवेषें दत्तात्रेय । चिन्मयस्वरूप देखिलें ॥ ६२ ॥ मग खडबडोनि उठले । भुन्याबुवांनीं चरण धरिले ।

बारंवार साष्टांगें नमिले । दत्तात्रेय नरहरि ॥ ६३ ॥ भुन्याबुवा करिती विज्ञापना । "महेश्वरा जनार्दना । मदनांतका त्रिलोचना । त्रिपुरमर्दना केशवा ॥ ६४ ॥ आदिनारायणा विधिहरिहरा । उत्पत्ति-स्थिति-संहारकरा । त्रिगुणातीत निर्विकारा । दयासागरा गुरुवर्या ॥ ६५ ॥ बहुत दिवसांपासून । तळमळित होतें व्यग्र मन । पुष्कळ भेटले महात्माजन । केलीं साधनें अनिवार ॥ ६६ ॥ वैकुंठ कैलास सत्यलोक । सोडूनि जगत्कार्यें अनेक । मजवरी वळले जगन्नायक । श्रीगिरिनारीं सुखदायक साच कीं ॥ ६७ ॥ बुडालों होतों संशयसागरीं । स्मरणें धांवले श्रीहरि । पातले दीनभक्तकैवारी । श्रीगिरिनारीं अवधूत ॥ ६८ ॥ मायबाप सोयरे गणगोत । सखया तुम्हीच सत्य आप्त । तुम्हांविना अखिलब्रह्मांडांत । दुजें दैवत नसेच कीं ॥ ६९ ॥ जन्म देती जननीजनक । वाढविती करूनि ममता कौतुक । परंतु भवसंसारतारक । समर्थ न होती कदापि ॥ ७० ॥ मातापितरादि इतर दैवतें । न होती समर्थ तारावयातें । एकचि त्रैलोक्यांत मोक्षदाते । श्रीगुरु स्वामी समर्थ ॥ ७१ ॥ अविद्या-अज्ञानकार्यसहित । मायासंसारप्रपंच कल्पित । भवसागर दुस्तर क्षणांत । उल्लंघित गुरुदास ॥ ७२ ॥ अज्ञानबंधन सोडविता । वेदांतविज्ञानार्थ सुनिश्चिता । सद्गुरुनाथ एकचि दाता । ब्रह्मसायुज्यता प्राप्त्यर्थ ॥ ७३ ॥ धन्य धन्य आजि सुदिन । स्मरण करितां अत्रिनंदन । उभे राहिले साक्षात् येऊन । दिधलें दर्शन अंतर्बाह्य" ॥ ७४ ॥ स्तवन ऐकूनि स्वामिराय । भुन्याबुवास वदती सदय । "काय मानसीं असती संशय । सांगा निर्भय सत्वरें ॥ ७५ ॥ संशय कोठून उद्भवती । पदार्थीं विकल्प कोठें वसती । उपजती तेथेंच अस्त पावती । शोधा अंतरीं विचारें ॥ ७६ ॥ मजला संशय वाटतो । ऐसें जाणूनि कोण म्हणतो । संशयाहूनि भिन्न असतो । म्हणूनि जाणतो संशयासी ॥ ७७ ॥ संशयाचा द्रष्टा जाणता । तोचि आत्मा आपण तत्त्वतां । संशय-संशयी यांविरहिता । परतोनि पहावें हृदयीं त्या ॥ ७८ ॥ सर्वा-



धिष्ठानआत्मा अव्यय । सर्वांतरीं व्यापक असे चिन्मय । साक्षी चेता निर्गुण अद्वितीय । आत्मा केवल आपणचि ॥ ७९ ॥ जो अज्ञानमाया संशयातीत । अनेक शब्द-वाक्यरहित । निःशब्दस्वरूप आत्मा निश्चित । पूर्णब्रह्म परात्पर ॥ ८० ॥ 'त्वंपद-तत्पदा'चा जो लक्ष्यार्थ । 'असि' पदें अभेदें निरुपाधि यथार्थ । प्रत्यगात्मा-ब्रह्मैक्य परमार्थ । सत्य सत्य हाचि असे ॥ ८१ ॥ जीव ईश्वर लहानमोठेपणा । किंचिज्ञ-सर्वज्ञा शक्तिगुणा । 'सोऽयं देवदत्त' ही 'भाग-लक्षणा । लक्षित जाणा आत्म्यातें ॥ ८२ ॥ हेंचि महावाक्यार्थ स्पष्ट विवरण । करूनि सांगूं निर्वाण । कथिलें ग्रंथीं जें स्वात्मनिरूपण । करावें श्रवण आदरें तें ॥ ८३ ॥ पंचकोशादिकांचा विचार ज्यांनीं । केला असेल जाणा त्यांनीं । तत्त्वमस्यादि वाक्य विचारावांचूनी । केल्याचें तें काय फळ ॥ ८४ ॥ महावाक्यविचार विहितासी । म्हणजे वाक्यविचारशून्यासी । हा 'प्रत्यक्ष' आत्मा असूनि समीपेंसी । 'परोक्षवत्' भासतो ॥ ८५ ॥ आत्मा 'प्रत्यक्' प्रकाशमान । सर्वदा सर्वत्र आहे भासमान । तथापि वाक्यार्थविचारावांचून । कदा नये अनुभवासी ॥ ८६ ॥ म्हणूनि व्हावया आत्मसाक्षात्कार । तत्त्वमस्यादि महावाक्यार्थविचार । अवश्य केलाच पाहिजे साचार ॥ मोक्षाधिकारी जनांनीं ॥ ८७ ॥ तस्मात् पदार्थ-शोधनपूर्वक । महावाक्यार्थविचारें आवश्यक । झाल्याविना आत्मज्ञान सम्यक् । निश्चयात्मक न होत तें ॥ ८८ ॥ स्वबुद्धिबळेंकरूनि केवळ । वाक्यविचार जरी केला पुष्कळ । तथापि स्वात्मानुभव निर्मळ । होणार नाहीं सर्वथा ॥ ८९ ॥ म्हणूनि श्रीसद्गुरूसी शरण । अगत्य जाऊनि धरावे दृढ चरण । म्हणजे सामर्थ्यवंत सद्गुरु दयाघन । कृपा प्रसाद करतील ते ॥ ९० ॥ त्या श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ-मुखें वाक्यविचार । समजूनि उमजावा यथाशास्त्र । तेणें क्षणांत आत्मसाक्षात्कार । अवश्यमेव होतोचि ॥ ९१ ॥ आतां पदार्थ-विचार कथन । ऐका हो श्रोते साधुजन । 'तत्त्वमसि' या वाक्यांत पदें तीन । 'तत्-त्वं-असि' ऐशीं ॥ ९२ ॥ वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ ।

ऐसे दोन आहेत पदाचे अर्थ । त्यांत प्रथम 'त्वं' या पदाचा वाच्यार्थ । सांगूं शास्त्रविहित जो ॥ ९३ ॥ मी स्थूल वा कृश आहें । ऐसें देहबुद्धिधर्में वदताहे । मी काणा वा बधिर आहें । हा इंद्रियधर्मासी ॥ ९४ ॥ तथा सुखदुःखादि शुभाशुभासी । या अंतःकरणाच्या धर्मासी । क्षेत्रज्ञ आत्म्याच्या ठायासी । अभेदेंकरून आरोपिलें ॥ ९५ ॥ म्हणजे तादात्म्य-अध्यासेंकरून । कर्तेपणादि अभिमान धरून । देहधर्मांचें आरोपण । करितसे आत्मयावरी ॥ ९६ ॥ मी काणा आहे बधिर । या प्रकारें वृत्ति अहमाकार । इंद्रियधर्मांचा आरोप आत्म्यावर । साहंकारें करणें जो ॥ ९७ ॥ विज्ञानकोशाध्यारोपपूर्वक । मी कर्ता असे अभिमानात्मक । ऐसा जो होतसे बोधविवेक । 'वाच्यार्थ' तोचि त्वं-पदाचा ॥ ९८ ॥ म्हणजे चैतन्यात्मा सोपाधिक । तो त्वं-पदाचा वाच्यार्थ सम्यक । यासी शास्त्रज्ञ ते कित्येक । 'शबलार्थ'ही म्हणताति ॥ ९९ ॥ याचें विशेष स्पष्टीकरण । जें वज्रशुचिउपनिषदीं प्रमाण । तें सत्यत्वें कळावया कारण । बोलूं जनांच्या हितार्थ ॥१००॥ श्रोत्र त्वचा नेत्र जिव्हा घ्राण । हें 'ज्ञानेंद्रिय-पंचक' जाण । हस्त पाद वाचा गुदा शिश्न । हें होय 'कर्मेंद्रिय-पंचक' ॥ १ ॥ प्राण अपान व्यान उदान । पांचवा तो वायु समान । नाग कूर्म कृकल देवदत्त धनंजय जाण । दश प्रकारचे वायु हे ॥ २ ॥ मन बुद्धि अहंकार चित्त । हें 'अंतःकरण-चतुष्टय' सत्य । शब्द स्पर्श रूप रस गंध असत । 'पंचविषय' प्रसिद्ध ते ॥ ३ ॥ वचन आदान आनंद विसर्ग गमन । हें कर्मेंद्रियाचें वर्तन । विकल्प निश्चय अहंकार अनुसंधान । ज्ञान हें ज्ञानेंद्रियाचें समजावें ॥ ४ ॥ अन्नमय प्राणमय मनोमय । विज्ञानमय आणि आनंदमय । पंचकोशात्मकसहित होय । देहेंद्रिय-पसारा हा ॥ ५ ॥ अधिदैविक अध्यात्मिक । तिसरा बोलिला अधिभौतिक । हे त्रिविध ताप दुःखकारक । होती प्राणीमात्रासी ॥ ६ ॥ सत्त्व रज तम हे त्रिगुण । आणि त्रिकाल भूत भविष्य वर्तमान । पुत्रेषणा वित्तेषणा लोकेषणा जाण । 'ईषणात्रय'सहित हे ॥ ७ ॥ अशन पिपासा शोक मोह ।



जरा मरण या 'षड्ऊर्मी'सह । तादात्म्यअध्यास अहंदेह । चैतन्यात्मा सोपाधिक ॥ ८ ॥ 'अस्ति जायते वर्धते अपक्षीयते । विपरिणमते विनश्यते' । या षड्भाव-विकारसहित येथें । 'त्वंपद-वाच्यार्थ' कथिलासे ॥ ९ ॥ त्वं-पदाचा लक्ष्यार्थ सांप्रत । कथितों परिसा हो भक्तिमंत । शरीर इंद्रियादि अहंकारातीत । साक्षी आत्मा अखंड असे ॥ ११० ॥ देह आणि देहाभिमान । तथा इंद्रियादिकांहून । आत्मा साक्षी अत्यंत भिन्न । निरुपाधिक विराजे ॥ ११ ॥ सर्वत्र प्राण्यांचे हृदयीं स्थित । अद्वितीय ब्रह्मात्मा सदोदित । अखिलोपाधि-विनिर्मुक्त । हाचि 'त्वंपद-लक्ष्यार्थ' जाणावा ॥ १२ ॥ आतां तत्पदाचा वाच्यार्थ श्रवण । करा हो श्रोतेजन आपण । वेदांतउपनिषद-वाक्यांत प्रमाण । ब्रह्म ज्ञेय संवेद्य जें ॥ १३ ॥ मायोपाधिक सकल जगताचें । उत्पत्ति स्थिति आणि संहाराचें । उपादान कारण प्रपंचाचें । सर्वज्ञ सर्वेश्वर असे जें ॥१४॥ सर्वकामप्रद संपूर्णशक्तिमान् । सर्वज्ञत्वादि उपाधिसहवर्तमान । सत्यज्ञानानंदस्वरूप चैतन्यघन । 'तत्पदवाच्यार्थ' तो म्हणिजेला ॥ १५ ॥ आतां तत्पदाचा लक्ष्यार्थ कथित । कर्तृत्वलक्षण प्रपंचोपाधिरहित । विविधोपाधिनिर्मुक्त विश्वातीत । अज्ञानद्वैतरहित जें ॥ १६ ॥ सर्वज्ञत्वादि विशिष्ट जगत्कर्तेपणा । इत्यादि उपाधिविरहित जाणा । विशुद्धविज्ञान-अद्वैतपणा । चैतन्याक्षरस्वरूप ऐसें ॥१७॥ जें आत्मस्वरूप अनुभवगम्य । तेंचि 'तत्पदलक्ष्यार्थ' आहे मान्य । या प्रकारें पदार्थविवेचन योग्य । केलें असतांही बोध नव्हे ॥१८॥ म्हणूनि 'सामानाधिकरण' । त्रयसंबंधाचें ज्ञानाविण । तत्त्वमसि महावाक्यार्थज्ञान । होणार नाहीं यथार्थ ॥ १९ ॥ आतां सामानाधिकरण । म्हणजे एक अधिकरणीं विद्यमान । जे जातिक्रियादि गुण । परस्पर असती ते ॥१२०॥ विशेषण-विशेष्यरूप असून । एकविभक्त्यंत जीं पदें दोन । तेंचि 'सामानाधिकरण' । उदाहरणें परिसावीं ॥ २१ ॥ 'नीलो घटः, रक्तं कमलं' हीं दोन । विशेषणविशेष्यभाव असून । परस्पर एकविभक्त्यंत म्हणून । लक्ष्यलक्ष्यकत्वसंबंध असे ॥ २२ ॥ तैसा येथें तत्पद-त्वंपदाचा । सामानाधिकरण्यसंबंध आहे साचा । कारण प्रथमा-

विभक्तींत दोहोंचा। परस्पर विशेषण-विशेष्यादि संबंध ॥२३॥ म्हणजे पदाचे एकार्थी-निष्ठत्व। आणि विशेषण-विशेष्यभाव। तैसेंचि लक्ष्यलक्ष्यकत्व । त्रयसंबंधीं सामान्याधिकरण्य हें ॥ २४ ॥ महावाक्य हें 'तत्त्वमसि' । म्हणजे तें तूं आहेसी। चैतन्यरूप अर्थासी। तात्पर्ययोगें जाणवितें ॥ २५॥ त्वं या पदार्थाचें विशेषण । तत्पदार्थ हें होतें जाण। त्वं-तत्-असिवचन । म्हणजे तूं तें आहेसि ॥ २६ ॥ ऐसें बोलतां तत्पदार्थाचें । विशेषण त्वंपद होतसे साचें । विशेषण-विशेष्यभावसंबंध दोहोंचे । अभेदार्थ जाणविती ॥ २७ ॥ तथा तत्पद आणि त्वंपदाचा । आत्मयासंगें संबंध साचा । लक्ष्य आणि लक्षकपणाचा । आहेचि नित्यसंबंध ॥ २८ ॥ म्हणजे तत्पद-त्वंपद हें लक्षक । आणि आत्मा लक्ष्य असे निरुपाधिक । महावाक्यांतील संबंध निःशंक । आहे त्रिविधप्रकारें ऐसा ॥ २९ ॥ म्हणूनि साम्प्रत सामानाधिकरण्याचें । स्वरूप ऐकावें स्वहिताचें । ज्यायोगें महावाक्यार्थाचें । यथार्थ ज्ञान होय तें ॥ १३० ॥ व्हावया लोकांत प्रवृत्ति । भिन्न भिन्न कारणें ज्याचीं असतीं । तथा भिन्नभिन्न अर्थाचे होती । वाचक ऐसे शब्द जे ॥ ३१ ॥ ऐशा वाचक शब्दांच्या तात्पर्यानें । एकार्थाविषयीं जो संबंध होणें । त्या संबंधासी 'सामानाधिकरण्य' म्हणणें । लक्षणाप्रतिपादक निश्चयें ॥ ३२ ॥ आतां या 'तत्त्वमसि' महावाक्यांत । लक्षणेवांचूनि बोध न होत । म्हणूनि लक्षणा अवश्ययुक्त । कळावयासि सांगूं ती ॥ ३३ ॥ जीव प्रत्यक्ष तथा परिच्छिन्न । आणि ब्रह्म परोक्ष तथा परिपूर्ण । या प्रकारें हीं असतीं दोन । विरुद्धधर्मी परस्पर ॥ ३४ ॥ कारण कीं प्रत्यक्षत्व आणि परोक्षत्व । परस्पर विरुद्धधर्म असत । अर्थात एकेठायीं न वसत । तत्-त्वंपदार्थ परस्पर ॥ ३५ ॥ या प्रकारें त्यागूनि विरुद्धार्थ । व्हावया अखंडबोधार्थ । या तत्-त्वंपदार्थीं यथार्थ । लक्षणा स्वीकारिली पाहिजे ॥ ३६ ॥ तें लक्षणास्वरूप ऐका भलें । कोणत्याही प्रमाणाच्या विरोधामुळें । ज्या वाक्यांत ज्या पदाचा कळे । मुख्यार्थ ऐसा जो ॥ ३७ ॥



मुख्यार्थ म्हणजे प्रतिपाद्यार्थ । त्या वाक्यांत त्या मुख्यार्थाचा स्वीकार न संभवत । त्या पदाचा संबंध्यर्थ । मुख्यार्थासंगें जो होय ॥ ३८ ॥ त्या मुख्यार्थसंबंधीं अर्थांत । पदाची जी प्रवृत्ति होत । त्या प्रवृत्तीस उक्त । लक्षणाप्रतिपादक म्हणताति ॥ ३९ ॥ काव्यप्रकाश ग्रंथांत । लक्षणास्वरूप प्रतिपादित । तेंचि परिसा हो श्रद्धायुक्त । श्रोते समस्त सज्जन ॥ १४० ॥ मुख्यार्थ म्हणजे वाच्यार्थाचा । बोध होतां बोधितार्थाचा । लोकप्रचारें अथवा प्रयोजन योगाचा । मुख्यार्थासंगें संबंध जो ॥ ४१ ॥ तो संबंध ठेवणारा अन्यार्थ । जो वृत्तियोगें जाणिला जात । त्या अर्थासी म्हणती पंडित । 'लक्षणावृत्ति' या नामें ॥४२॥ ती लक्षणा त्रिविधा होत । एक 'जहत्' दुसरी 'अजहत्' । तिसरी 'जहदजहत्'। त्यांतील प्रथम कथितसे ॥ ४३ ॥ संपूर्ण पदवाच्यार्थ त्यागून । वाच्यार्थासंगें युक्तार्थ भिन्न । म्हणजे संबंध ठेवणारा अर्थ अन्य । त्या भिन्नार्थाविषयीं ॥ ४४ ॥ म्हणजे त्या भिन्नार्थीं जी पदाची वृत्ति । तियेसि 'जहल्लक्षणा' म्हणती । 'वृत्ति' म्हणजे वर्तन संबंध स्थिति । प्रवृत्ति इत्यादि अर्थ होय ॥ ४५ ॥ ती जहल्लक्षणा कोठें संभवत । 'गंगायां घोषः' इत्यादि स्थलांत । 'मंचाः क्रोशन्ति' याही वाक्यांत । प्रसिद्ध लक्षणा परिसावी ॥ ४६ ॥ सांप्रत दार्ष्टांतीं 'तत्त्वमसि' या वाक्यांत। ही जहल्लक्षणा न संभवत । म्हणूनि ती घेऊं नयेचि अर्थांत । तें कारण परिसावें ॥ ४७॥ येथें तत्-पदाचा आणि त्वं-पदाचा । तसाचि या दोन्ही पदार्थांच्या संपूर्ण अंशाचा । त्याग होत नाहीं साचा । विरुद्धांशाचा मात्र होतसे ॥ ४८ ॥ 'गंगायां घोषः' या वाक्यांत। 'गंगा' या पदाचा मुख्यार्थ 'प्रवाह' असत। 'घोष' म्हणजे गौळवाडा बोलिजेत। त्या प्रवाहीं नसे गौळवाडा ॥ ४९ ॥ उदकप्रवाहीं लोकस्थिति। प्रत्यक्ष प्रमाणानें दिसेना ती । आणि आधार नसल्यानें उपपत्ति । होत नसे वाक्याची ॥ १५० ॥ यास्तव प्रवाहरूप अर्थ त्यागून । प्रवाहयुक्तसंबंधीं 'तीर'पदाचें करितां ग्रहण । तैसें येथें न संभवे म्हणून । जहल्लक्षणा घेऊं नये ॥ ५१ ॥ कारण वाच्यार्थाचा संपूर्ण । त्याग नाहीं सर्वथा जाण । आणि एक-

देश पदार्थ-ग्रहण । म्हणून न संभवे 'जहती' ही ॥५२॥; 'अजहल्लक्षणा' स्वरूप आतां । परिसावें बोधाकरितां । उदाहरणासहित तत्त्वतां । अलंकारशास्त्रीं कथिलें तें ॥ ५३ ॥ शक्ति-वृत्तियोगें प्रतीतीसी । येणारा जो अर्थ तयासी । न त्यागितां त्या प्रतीतार्थासी । म्हणजे वाच्यार्थाचा त्याग नसे ॥ ५४ ॥ पदाच्या वाच्यार्थापासून । भिन्नार्थाविषयीं जें प्रवृत्तिवर्तन । तियेसी नाम अजहल्लक्षण । अलंकारशास्त्रज्ञ म्हणताति ॥ ५५ ॥ 'शोणो धावति' उदाहरण ऐसें । म्हणजे लाल रंगाचा धांवतसे । या वाक्यांत 'शोण' पदाचा असे । मुख्यार्थ तो रक्तगुण ॥ ५६ ॥ रक्तगुणासि क्रिया धांवणें । हें तो न संभवे होणें । म्हणूनि अश्वार्थ उक्त समजणें । शोण शब्दाचा तात्पर्यें ॥ ५७ ॥ यामुळें शोण शब्दाचा । वाच्यार्थ जो रक्तगुण त्याचा । त्याग होत नाहीं साचा । हे ध्यानांत ठेवणें ॥ ५८ ॥ तथा वाच्यार्थाहूनि भिन्न । अश्वाचें होतसे ग्रहण । म्हणूनि हें उदाहरण । अजहल्लक्षणेचें समजावें ॥ ५९ ॥ 'काकेभ्यो दधि रक्ष्यतां' इति । यथा 'छत्रिणो गच्छन्ति' । हीं उदाहरणें 'अहजती'-। लक्षणेचीं जाणावीं ॥ १६० ॥ आतां 'तत्त्वमसि' या वाक्यांत । अजहल्लक्षणा अयुक्त । ग्रहण करण्यास योग्य न होत । कारण त्याचें परिसावें ॥ ६१ ॥ वाच्यार्थाच्या एकदेशाचा त्याग । आणि एक देशाचा ग्रहणयोग । होतो, म्हणूनि येथें साङ्ग । अजहल्लक्षणाही नसे ॥ ६२ ॥; आतां 'जहदजहल्लक्षणा'-स्वरूप । प्रतिपादित ज्ञानविज्ञान-प्रदीप । श्रीमच्छंकराचार्य शिवस्वरूप । जगद्गुरुविरचित ऐका ते ॥ ६३ ॥ वाच्यार्थाचा त्याग करणें । आणि लक्ष्यार्थासी घेणें । हें जिच्यायोगें समजणें । ते 'जहदजहल्लक्षणा' ॥ ६४ ॥ वाच्यार्थरूप एकदेशातें त्यागून । लक्ष्यार्थरूप एकदेशाचें बोधन । करिते, तियेसी म्हणती बुधजन । 'जहदजहल्लक्षणा' ॥ ६५ ॥ या लक्षणेचें प्रसिद्ध उदाहरण । 'सोऽयं देवदत्तः' हें जाण । म्हणजे 'तो हा देवदत्त' ब्राह्मण । ऐसें भाषण बोलतां ॥६६॥ या वाक्यांत 'सः' या पदाचा अर्थ केवल । तो पूर्वीचा परोक्ष देशकाल । वयोवस्था इत्यादि विशिष्ट केवल । ज्या स्थलीं देवदत्त होता तो ॥६७॥ आणि 'अयं' पदाचा अर्थ स्पष्ट ।



हा वर्तमानदेशकालादिविशिष्ट । वयोवस्था वृद्ध ह्या स्थलीं श्रेष्ठ । 'तो हा देवदत्त' खचित आहे ॥ ६८ ॥ 'अयं'शब्दप्रत्यभिज्ञान वचन । पूर्वीं अनुभविलेले पदार्थादिकरून । कालांतरीं पाहिले असतां अभिन्न । 'तोच हा पदार्थ' ऐसें ज्ञान जें ॥ ६९ ॥ या दोन्ही पदांच्या वाच्यार्थांत । विशेष्य एकचि असे देवदत्त । परंतु 'सोऽयं' या दोन्ही विशेषणांत । विरोध ऐसा व्यापक ॥ १७० ॥ म्हणजे गेलेले जे देशकालादिक । आणि वर्तमानकाल देशादिक । टाकूनि दोन्ही पदांचे विरुद्धार्थ असम्यक् । अविरुद्ध देवदत्तस्वरूप लक्षावें ॥ ७१ ॥ त्या प्रकारेंच तत्त्वमसि या वाक्यांत । तत्पदाचा वाच्यार्थ मायोपाधियुक्त । सर्वज्ञत्वादि-धर्मविशिष्ट होत । 'तत्पद' वाच्यार्थ चैतन्यात्मा ऐसा ॥ ७२ ॥ आणि जो मायाकार्यअविद्योपाधिक । किंचिज्ञत्वादि-धर्मविशिष्ट परिच्छेदक । चिदाभास तो 'जीव' संज्ञक । त्वंपद-वाच्यार्थ ऐसा असे ॥ ७३ ॥ या 'तत्-त्वं' दोन्ही पदांच्या अर्थांत । विशेष्यं जें परमात्मस्वरूप सचित् । त्या शुद्धपरमात्म-चैतन्यस्वरूपांत । विरोध सहसाही नसे ॥ ७४ ॥ परंतु सर्वज्ञत्वादि धर्मयुक्त । तथा किंचिज्ञत्वादिधर्मसहित । ह्या दोन्ही धर्मरूपवाच्यार्थाच्या अंशांत । विरोध वाटत असे ॥ ७५ ॥ म्हणूनि ते दोन्ही विरुद्ध विशेषांश । त्यागूनि घ्यावें शुद्ध 'चिद्रूप'परमेश । याकरितां 'भागत्याग-लक्षणा' अवश्य । अंगीकारावी विवेकें ॥ ७६ ॥ त्या जहदजहल्लक्षणेचें । प्रतिपादन करिती शास्त्रज्ञ साचें । तेंचि लक्षण बोलूं अभेदार्थाचें । शुद्धस्वरूपप्राप्त्यर्थ ॥ ७७ ॥ 'सोऽयंदेवदत्तः'वाक्य ऐसें । म्हणजे 'तो हा देवदत्त' असे । टाकूनि परोक्ष अपैसें । जे जे देशकालादिक ॥ ७८ ॥ तें परोक्ष देशकालादिविशिष्टपण । तथा अपरोक्षदेशकालादिविशिष्टपण जाण । हे दोन्ही विरुद्धधर्म त्यागून । केवल देवदत्तस्वरूप लक्षावें ॥ ७९ ॥ 'सः' आणि 'अयं' या पदार्थाच्या ऐक्यासी । प्रतिपादन करणाऱ्या या भागलक्षणेसी । अखंडार्थबोध व्हावयासी । महावाक्यांत ग्रहण कीजे ॥ १८० ॥ प्रतिपादित ती जहदजहल्लक्षणा । 'जीवब्रह्मैक्यार्थ' निर्दोष जाणा । म्हणूनि तत्त्वमस्यादि वाक्यांत योजना । करूनि स्वस्वरूप अनुभवावें

॥ ८१ ॥ तत्पदस्थित परोक्षपणाचा । तथा त्वंपदस्थित प्रत्यक्षादिपणाचा । त्याग करूनि सर्वोपाधींचा । लक्ष्यात्मस्वरूपीं मिळावें ॥ ८२ ॥ जाणवूनि केवल सचिद्रूपासी । 'असि' या पदेंकरून अभेदेंसीं । तत् आणि त्वं-पदार्थाच्या ऐक्यासी । लक्षणा निःसंशय बोधितसे ॥ ८३ ॥ एवं 'तत्त्वमसि' वाक्यार्थज्ञान । प्राप्त करूनि घेती जे सज्जन । तयांसि ब्रह्मानंदप्राप्ति जाण । हें आशीर्वचन निश्चयें" ॥ ८४ ॥ यापरी सरल बोध आणि आशीर्वचन । श्रीगुरुमुखें होतांचि श्रवण । अखंडसमाधि लागली पूर्ण । भुऱ्याबुवासी तात्काल ॥ ८५ ॥ विसरले अवघें देहभान । ब्रह्मानंदीं झाले निमग्न । जीवन्मुक्तस्थितीसि जाण । पावले गुरुकृपें भुऱ्याबुवा ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । दशमोऽध्याय रसिक हा ॥ १८७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे दशमोऽध्यायः समाप्तः ॥ १० ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

